# ॐ श्री साईराम

## प्रशांति संदेश भाग ८२

तुम्ही दिलेल्या वेळाबद्दल तुमचे खूप आभार. या सर्व संदेशांबद्दल तुम्ही मोठी कळकळ व आस्था दर्शवत आहात. तुम्हां सर्वांना, भगवान बाबांचा कृपाशीर्वाद मिळो.

आजच्या सत्रातील विषय आहे, 'नो वेल.' 'नो वेल' म्हणजेच, योग्य प्रकारे जाणा. आपल्याला हे सर्व चांगल्या रीतीने जाणून घ्यायचे आहे. जे मुद्दे आता आम्ही सांगणार आहोत, त्यांचे आपल्याला स्पष्टपणे आकलन व्हायला हवे.

आपल्याला हे माहीत असायला हवे की आपले गुरू, भगवान बाबा हे आपल्या अंत:करणातच आहेत. आपल्या कल्पना असतात की स्वामी बाहेर आहेत. स्वामी प्रशांतिनिलयममध्येच आहेत. स्वामी बंगलोरच्या वृंदावनमध्ये आहेत किंवा स्वामी मंदिरात आहेत वगैरे. ते जरी देहाने बाहेर वावरताना दिसले तरी आध्यात्मिक दृष्ट्या ते तुमच्या हृदयातच आहेत.

सध्या तर स्वामी मानवी रूपात नाहीत हे लक्षात आल्याने त्यांची उणीव भासते. परंतु खरोखरी, ते आपल्या अंतर्यामीच आहेत. तेथून त्यांना निसटता येणार नाही, तसेच आपण पण त्यांना चुकवू शकत नाही. याचे कारण ते आपल्यामध्येच आहेत. याचाच मतितार्थ असा की स्वामी पूर्ण तयारीने आपल्या प्रत्येक बाबीशी निगडीत आहेत आणि आपल्याला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांची उकल आणि सोडवणूक करायल सदैव सज्ज आहेत.

आपल्याला अशी हजारो उदाहरणे माहीत आहेत की जेव्हा भगवान बाबांनी आपल्या भक्तांच्या अडीअडचणींचे व संकटांचे निवारण केले, ज्या भक्तांनी भगवान बाबांची प्रार्थना केली, त्यांची भगवान बाबांनी संकटातून मुक्तता केली. शिवाय त्यांना शुभाशीर्वाद प्रदान केले. काही भक्तांना तर त्यांनी मृत्यूच्या दारातून परत आणले. यालाच 'भक्तरक्षण' असे म्हटले जाते. भक्तांचे रक्षण करणे आणि त्यांना सांभाळणे, त्यांचा प्रतिपाळ करणे हे आपल्या स्वामींचे ब्रीद आहे.

आता काही मंडळींना अशी शंका येईल की स्वामी जेव्हा जेव्हा सर्वांना काहीतरी प्रदान करतात, तेव्हा यामुळे त्यांचे काही नुकसान होईल का? त्यांचे सामर्थ्य, कर्तृत्व, ताकद कमी होईल का? कारण ते सर्वांना सदैव मुक्तहस्ते देतच असतात. तसे झाले तर काय होईल? निष्पाप आणि निष्कपटी मनाच्या, काही जणांना हा प्रश्न पडतो. त्यामुळे त्यांच्या या भाबड्या शंकेचे आपण निरसन करायला हवे.

आपल्याला समुद्राबद्दल माहिती आहे. सूर्याच्या उष्णतेमुळे, समुद्राच्या पाण्याची वाफ होते आणि ते बाष्प ढगात जमा होते. नंतर या ढगातूनच पाऊस पडतो. या पावसाचे पाणी सरोवरे, नद्या,नाले यात जाते. नद्या जेव्हा समुद्राला मिळतात, तेव्हा हे पाणी पुन्हा समुद्रात परत आणून टाकतात. समुद्र, त्यामुळे जसा आहे, तसाच राहतो. अशा प्रकारे समुद्रातलेच पाणी ढग, पाऊस यांद्वारे पुन्हा समुद्रालाच मिळते.

अशाच प्रकारे, भगवान बाबा, सदासर्वदा आपल्याला काही देत राहिले. त्यांनी त्यांच्या कृपेचा वर्षाव केला, त्यांची दिव्य शक्ती संक्रमित केली, तरी हे सर्व नंतर त्यांच्याचकडे नि:संशयपणे परत जाणार. याचे कारण ते स्वत:च ईश्वर आहेत. परिपूर्ण आहेत.

आपण हे पण चांगल्या प्रकारे जाणले पाहिजे की स्वामींचे कुटुंब हे विश्वव्यापी आहे. तुमचे किंवा माझे कुटुंब यांना मर्यादा असते. परंतु संपूर्ण विश्व हे ईश्वराचे कुटुंब असते. सर्व चराचर सृष्टी त्याचीच आहे. तेव्हा आपले स्वामी हे 'विश्वकुटुंबी' आहेत. संपूर्ण विश्वाची व्यवस्था तेच चालू ठेवतात.

आपल्याला हे पण योग्य प्रकारे समजले पाहिजे की आपले प्रश्न, समस्या, अडीअडचणी हे सर्व स्वामींचेच होतात. त्यामुळे त्यांचे हृदय कारूण्यभावाने द्रवते. मग पूर्ण तयारीनिशी सज्ज होऊन ते आपल्यापैकी प्रत्येकाला सहाय्य, मदत करतात. तेव्हा काही जणांवरच त्यांचा अनुग्रह होतो, त्यांनाच त्यांचा आशीर्वाद मिळतो आणि

इतरांना ते टाळतात वा त्यांचेकडे दुर्लक्ष करतात असे नाही. आपल्या प्रश्नांचे, त्यांचेच प्रश्न म्हणून, स्थित्यंतर होत असते आणि त्यामुळे, आपले स्वामी मोठ्या उदार मनाने सामोरे जाऊन आपल्यापैकी प्रत्येकाला सहाय्य करत असतात.

यासाठी आपण भगवान बाबांना संपूर्णतया शरण गेले पाहिजे. या शरणागत अवस्थेचे सदैव स्मरण ठेवले पाहिजे. असे झाले तरच आपले गुरू, स्वामी, सामोरे येऊन, सखोलपणे आपल्या प्रश्नांची उकल करतील. भगवान बाबा, आपल्याला वारंवार सांगत असतात की तुमचे हृदय दोन आसनांच्या सोफ्यासारखे, कोचासारखे नाहीतर ते एक आसनी कोचाप्रमाणे आहे. त्यामुळे तेथे फक्त एकच जण राहू शकतो. दोघेजण नाही. म्हणून, जेव्हा आपण संपूर्ण शरणागती पत्करतो तेव्हाच आपल्या हृदयात फक्त भगवान बाबांच्या निवासासाठी जागा असते. अन्य कोणासाठीही नाही.

आपल्याला आलेल्या प्रचितीमुळे हे स्पष्टपणे कळते की स्वामी आपल्यापासून दूर राहत नाहीत. आपल्या समस्यांबद्दल, ते योग्य प्रकारे उपदेश करतात. पण नुसता उपदेश करून थांबत नाहीत. तर आपला प्रश्न हा त्यांचा स्वत:चाच आहे अशा प्रकारे ते वागतात. आपल्या सर्वांचे कुटुंबप्रमुख या नात्याने सर्व समस्यांचा भार ते उचलतात आणि सर्व भक्तांना सर्वतोपरी सांभाळतात. नैनिताल येथील एका हृदयविकाराच्या रूग्णाचे प्राण त्यांनी कसे वाचवले हे आपल्याला ज्ञात आहेच. तसेच, एका दूरस्थ भक्ताला वाचवण्यासाठी आपले स्वामी त्यांचे शरीर सोडून तेथे गेले होते हे पण आपण जाणतो. गोव्याच्या भेटीत, एका भक्ताचा आजार, स्वत:वर घेण्यामुळे, स्वामींना किती थकवा आला होता, हे पण आपल्याला ठाऊक आहे. तेव्हा भक्तांच्या सर्व समस्यांचा परिहार करणे, हा स्वामींचा दैवी संकल्पच आहे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते, की आपले स्वामी केवळ एका प्रेक्षकाच्या भूमिकेत असतात. याउलट, आपल्या आयुष्यातील घटनांमध्ये भागीदार पण असतात. यामुळे, प्रश्नांची योग्य प्रकारे उकल झाली आहे ना, तसेच आपण आपली कर्तव्ये, जबाबदाऱ्या, योग्य प्रकारे पार पाडतो ना, हे सर्व स्वामी पाहत असतात. आपले प्रश्न हे त्यांचेच झाल्यामुळे ते स्वत:च सोडवतात.

याबद्दलचे प्रमाण देतो: आपल्याला माहिती आहे की स्वामींनी आपल्या भक्तांच्या, अनेक मुलामुलींचे विवाह लावून दिले. हे त्यांनी का केले? आपल्या भक्तांचा कुटुंबप्रमुख या नात्याने, त्यांनी हे समारंभ आयोजित केले. तसेच, येथे अनेक विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिक्षण मिळत आहे. हे सर्व ते का करतात? याऐवजी एखादे उपदेशपर प्रवचन देऊन ती सभा विसर्जित करून ते थांबू शकले असते. परंतु, भक्तांचे कुटुंबप्रमुख या नात्याने ते हे सर्व करत आहेत आणि मुलांच्या शिक्षणासाठी झटत आहेत. याचप्रमाणे हॉस्पिटल्स कशासाठी? अतिविशिष्ट रुग्णालये कशासाठी? आणि तीसुद्धा संपूर्णतया विनाशुल्क? आरोग्यविषयक प्रश्न सोडवायलाच हवेत, या दृष्टिकोनातून, स्वामींनी या रुग्णालयांची उभारणी केली आहे. यामध्ये विविध प्रकारचे रोग, व्याधी आणि विकृती यावर उपचार होऊ शकतील. असाध्य रोगांवर पण उपचार होतील. अशा प्रकारे ते आपला भार उचलतात. आपल्या स्वामींच्या दैवी संकल्पाने कार्य करण्याची त्यांची ही शैली आहे. खरोखरीच हे सर्व विस्मयकारक आहे. आपल्या कुटुंबातील प्रत्येक बारीक सारीक बाबा आणि काम यात ते सहभागी आहेत. तेव्हा प्रत्येकाचा हात धरून ते मार्गदर्शन तर करतीलच, आपल्या एकटे सोडून तर कधीच जाणार नाहीत, पण आपला हात पकडून, आपल्या गंतव्य स्थानाकडे, मुक्कामाच्या ठिकाणी, सुरक्षितपणे आणि यशस्वी रीतीने पोचवतील.

हेच, त्यांनी एक वेळेला सांगितले होते. त्यांचीच काव्यरचना उद्धृत करतो–

पुट्टपर्तीचे रहिवासी – पुट्टपर्तीच्या पुण्यक्षेत्रात भगवान बाबांचा निवास आहे हे तुम्हाला माहीत आहे.

हे अत्यंत दयाळू स्वामी आपले रक्षण करतात. आपल्याला सुरक्षित ठेवतात. आयुष्यातल्यया प्रत्येक क्षणी

ते आपल्याबरोबर असतात आणि आपली काळजी घेतात. आपल्या डोळ्याची पापणी, जशी डोळ्याची काळजी घेते, तद्वत्.

माता जशी आपल्या बालकाचा हात धरते आणि आपल्या मागोमाग त्याला सहजपणे चालवत नेते, त्याप्रमाणे ते आपला हात धरतात.

ते तुम्हाला कधीच सोडणार नाहीत किंवा घालवणार नाहीत. तुम्हाला ते कधीच एकटे पडू देणार नाहीत. तुम्हाला मदत करायला ते सुसज्ज आहेत.

स्वामी, तुमची सर्वतोपरी काळजी घेतील याबद्दल काहीच शंका नाही. हे आपण सर्वांनी चांगल्या प्रकारे जाणले पाहिजे.

काही समस्यांबद्दलचा आपला दृष्टिकोन असा असतो की त्या कधीच सुटणार नाहीत असे वाटत राहते. सारे उपाय संपले असे वाटते. मग आपण निराधार आहोत, दीनवाणे आहोत, अगदी एकाकी आणि असहाय आहोत, असा आपल्या मनाचा ग्रह होतो. परंतु या न सुटणाऱ्या समस्यांचा परिहार करायला आपले स्वामी आहेत ना!

म्हणून भगवान बाबांनी याबद्दल सांगितले आहे की,
तुम्ही जंगलात असला,
तुम्ही अवकाशात किंवा उंच आकाशात असला,
तुम्ही एखाद्या शहरात असा, गर्दीच्या शहरात असला,
तुम्ही एखाद्या खेडेगावात असा किंवा अगदी छोट्या खेड्यात असा,
तुम्ही एखाद्या पर्वत शिखरावर असा,
तुम्ही एखाद्या खोलवरच्या समुद्रावर असा,
भगवान बाबा, तुम्हाला कधीच विसरणार नाहीत.
हे भगवान बाबांचे खात्रीपूर्वक दिलेले आश्वासन आहे.

या कवितेत सांगितल्याप्रमाणे, भगवान बाबांच्या आश्रयामुळे आपण सुरक्षित आहोत. याबाबतीत, तुम्हाला काही वाटो, पण माझ्या मित्रांनो, मी तर असे म्हणेन की जरी आपल्याला विविध समस्यांनी घेरून टाकले, तरीसुद्धा आपण आनंदात असतो. याचे कारण, स्वामींच्या मुळे आपण सुरक्षित व सुखरूप आहोत. जर आपल्या आयुष्यात ते आलेच नसते, तर सध्याच्या परिस्थितीपेक्षा, तुलनेने, आपली अवस्था कितीतरी अधिक वाईट झाली असती.

तेव्हा, यासंबंधी कोणतीही कुरकूर किंवा तक्रार करू नका. तसेच, कुठल्याच प्रकारची गाऱ्हाणी सांगू नका. भगवान बाबा जर आपल्या समवेत नसते, तर या सर्व समस्या, आणखी प्रखर आणि दु:खद झाल्या असत्या. तेव्हा स्वामींच्यामुळेच आपण सुरक्षित व आनंदी आहोत, हे आपल्याला उमगावयाला हवे.

आपले स्वामी हे नेहमी शांत व स्वस्थचित्त असतात. ते मौनावस्थेत पण असतात. सहजपणे ते आपल्या अडचणींचे निराकरण करतात. नुसत्या शब्दांनी किंवा बोलून ते हे प्रश्न सोडवत नाहीत. या समस्यांचा परिहार करण्यासाठी त्यामागे त्यांचा दैवी संकल्प असतो.

सामान्यत: असे म्हटले जाते की आपणच आपल्या गुरूंना शोधत राहावे. धार्मिक ग्रंथ वाचनानंतर असे समजते की शिष्यांना, आपल्या गुरूंच्या शोधार्थ, बराच काळ व्यतीत करावा लागतो. हे लक्षात घेतले तर आपण या पृथ्वीतलावरचे अत्यंत नशीबवान लोक आहोत याचा उलगडा होतो. हे असे का? तर, प्रत्यक्ष भगवान बाबाच आपल्याला शोधत आले आहेत आणि त्यांनी त्यांच्या चरणकमलांजवळ आणले आहे. आपण

त्यांचे भक्त असावे हा त्यांचा संकल्प आहे. त्यांनी आपल्याला निवडलेले आहे. आपण, त्यांना निवडलेले नाही. हे उमगले की मग, इतर संप्रदायातील भक्तमंडळींच्या तुलनेने आपण किती सुदैवी आणि नशीबवान आहोत, याचा उलगडा होईल. तेव्हा यापुढे अधिक उशीर न करता आपण भगवान बाबांना संपूर्णतया शरण जायला हवे, अगदी बिनशर्त, विनाअट.

यानंतर, आपण हे जाणलेच पाहिजे की जेव्हा आपले गुरू, एखादी आज्ञा करतात तेव्हा त्याचे तत्परतेने परिपालन करणे हे आवश्यक आहे. हे असे का? मग याबाबतीत कुठे, कशाला, केव्हा, कसे असा विचार न करता हे आज्ञापालन झालेच पाहिजे. आपल्याला माहिती आहेच, की प्रशांतिनिलयममध्ये भगवान बाबांनी दिलेल्या आज्ञा कळकळीने आणि अत्यंत काटेकोरपणे पाळल्या जातात.

जेव्हा भगवान बाबा एखादी गोष्ट करायला सांगतात, तेव्हा जगभर पसरलेले त्यांचे सर्व भक्त त्यांच्या आज्ञेचे पालन करतात, काहीही झाले तरी. अनेक मंडळी अशी आहेत की त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन ते आले. काही जणांनी आपला व्यवसाय सोडून ते येथे स्थायिक झाले. अनेक जण असे आहेत की ज्यांनी भगवान बाबांच्या दैवी कार्यात सहभागी होण्यासाठी मोठा त्याग केला. हे कसे घडले? तर यामागे भगवान बाबांचाच संकल्प आहे. ते अत्यंत दयाळू असल्यामुळे त्यांची आज्ञा, त्यांचा दैवी संकल्प, आपल्या सर्वांच्या कल्याणासाठीच असतो.

भगवान बाबांनी, भक्त म्हणून आपला स्वीकार केला ही किती विस्मयकारक गोष्ट आहे. याबद्दल आपण त्यांचे खूप खूप आभार मानले पाहिजेत आणि त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. आपली शक्ती, सामर्थ्य आणि लायकी बघता आपण अगदी कोणीच नाही असे वाटते. परंतु भगवान बाबांनी अत्यंत दयाळू अंत:करणाने आपला स्वीकार केल्यामुळे आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याची जबाबदारी ते आपणहून स्वत:वर घेतात.

एकदा का आपण साई परिवारांत दाखल झालो की आपल्याला असा अनुभव येतो की आपण एका नवीन जगात प्रवेश केला आहे. आयुष्याकडे, त्याच्या शैलीकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन येतो. आपल्या वर्तणुकीमध्ये नमुनेदार बदल होतो. हे घडत असताना काय होते? तर आपण जुन्या गोष्टींचा त्याग करायला लागतो. जुन्या गोष्टी म्हणजे, बुरसटलेल्या आणि तापदायक कल्पना किंवा वाईट सवयी. उदाहरणार्थ, इतरांबरोबरची निरर्थक गप्पाष्टके, निंदानालस्ती, कुजबूज वगैरे हे सर्व थांबते. याचे कारण स्वामींच्या आज्ञेचे पालन होय. स्वामींचा संकल्प हा गूढ, अगम्य, अतर्क्य आणि न बदलणारा असतो. तेव्हा आपले काम म्हणजे कोणताही विचार न करता, स्वामींच्या संकल्पाचे पालन करणे. त्यासाठी कोणतेही तर्कशुद्ध वा संयुक्तिक कारण शोधण्याची गरज नाही. त्यांच्या संकल्पाचे काटेकोरपणे पालन करणे हेच आपले विहित कर्तव्य होय.

आपल्या आयुष्यात आपण सुखी आणि आनंदी आहोत याची आता प्रचीती येते. भगवान बाबांच्या संपर्कात आल्यामुळे, आपले आयुष्य अर्थपूर्ण झाले आहे असे कळते. तुम्ही विचाराल, कशाप्रकारे? तुम्हाला मेणबत्ती माहिती आहे. एक पेटलेली मेणबत्ती, दुसऱ्या मेणबत्तीला पेटवू शकते. आपले स्वामी म्हणजे अखंड ज्योत आहेत. ही दिव्य ज्योत ते आपल्याजवळ येऊ देतात. त्यामुळे आपली आत्मज्योत प्रज्वलित होते आणि अखंड ज्योतीच्या तेजाप्रमाणे तळपू लागते.

स्वामी, माझ्या अंत:करणातील ज्योत प्रज्वलित करून, ते तुम्ही प्रकाशाने उजळून टाकले आहे.

यामुळे हे आयुष्य आनंददायक आणि मनोरंजक झाले आहे. आयुष्याबद्दलच्या संकल्पना दिव्य, प्रकाशमय झाल्या आहेत. स्वामी, तुमच्याकडे येण्यापूर्वी मी अगदीच निरर्थक आणि पोकळ बुडाचा बाहुला होतो. माझ्या देहाच्या देव्हाऱ्यात कोणी नव्हते. माझ्या अंत:करणात तो दिव्यात्मा आहे हेही मला माहीत नव्हते. तसेच, तेथेच तो केंद्रबिंदू आहे याची पण जाणीव नव्हती. हे सर्व मला भगवान बाबा, तुमच्यामुळे समजले. आता माझे जीवन म्हणजे तुम्हीच आहात. माझ्या आयुष्याचा एक अविभाज्य भागच आहात.

या घटनेमुळे झाले काय? आपल्याला एक प्रकारची सूक्ष्म दृष्टी प्राप्त झाली आहे. सामान्यत: आपण नेहमीच ऐहिक, सांसारिक आणि बाह्य जगातील क्षणभंगूर गोष्टींमध्ये गुंतलेले असतो. बहिर्मुख असतो. आपल्या स्वामींकडे आल्यावर आपल्याला जे अंतर्ज्ञान मिळते, सूक्ष्म दृष्टी प्राप्त होते, त्यामुळे आपण आपल्या प्रिय ईश्वरासमोरच आहोत याची अनुभूती येते.

पूर्वी अशाच प्रकारची अनुभूती आपल्याला येत असे. जेव्हा आपले स्वामी देहधारी होते आणि दर्शन देताना ते भक्तांमधून फिरत असायचे तेव्हा त्यांच्या केवळ दर्शनानेसुद्धा या परमेश्वरी स्पर्शाची प्रचिती यायची. त्यामध्ये, त्यांच्या कृपादृष्टीबरोबर, दयाळू भाव असायचा. त्यावेळी आपल्याला असेही आढळून आले आहे की दर्शनाचे वेळी, स्वामी जेव्हा आपल्या निकट येतात तेव्हा आपल्या विचारात परिवर्तन होते. त्यात एक प्रकारची हुशारी आणि चमक येते आणि स्वामींच्या दिव्य तेजोवलयाची जाणीव होते.

अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठातील एक शास्त्रज्ञ प्राध्यापक बॅरोनोव्हस्की यांच्याबद्दल आपल्याला माहिती आहे. त्यांनी स्वामींचे फोटो काढले होते. दरवर्षी होत असलेल्या वासंतिक वर्गातील एका सत्रात, भगवान बाबांनी त्यांना भाषण करायला सांगितले होते. तेव्हा, बॅरोनोव्हस्की म्हणाले की जेव्हा त्यांनी किर्लियन फोटोग्राफी केली, तेव्हा त्यांना असे दिसले की भगवान बाबांच्या तेजोवलयातून, गुलाबी रंगाचा प्रकाश बाहेर पडत आहे आणि सर्व भक्तांकडून येणारा प्रकाश, त्यांचेकडे परत जात आहे. तेव्हा प्रकाश त्यांचेकडून प्रसारित होऊन, परत त्यांचेमध्येच विलीन होत आहे. असा प्रकार त्यांनी इतरत्र कोठेही पाहिला नव्हता. वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, बॅरोनोव्हस्की यांनी, भगवान बाबांच्या सभोवती एक मोठे तेजोवलय पाहिले. याबद्दल आपण सर्वांनी पूर्वीच ऐकले आहे, आणि याबद्दलचा वृत्तांत पण आश्रमाच्या मासिकातून प्रसिद्ध झाला आहे.

आपणा सर्वांना स्वामींच्या सहवासाची अनुभूती येते आणि त्यामुळे आपले आयुष्य मनोरंजक होते. यापूर्वी, आपल्याला आयुष्य म्हणजे एक अरिष्ट आहे असे वाटे. त्यात एक प्रकारची उदासीनता असे. आता मात्र आपण आपल्या सत्यस्वरूपाला जाणण्याची सुरूवात केली आहे. जे अत्यंत मोलाचे आहे यामुळेच स्वामी म्हणतात, इकडे या, परीक्षण करा आणि अनुभव घ्या. केवळ अंधश्रद्धेने याचा स्वीकार करायचा असे नाही.

कम ऑन! म्हणजे तुम्ही त्यांचे चितन करा, त्यांचे ध्यान करा. त्यांना जाणण्याची सुरुवात करा. त्यांची भजने ऐका. साई वाङ्मयाचा अभ्यास करा; त्यानंतर तुम्हाला जे अनुभव येतील, ते तपासून पाहा. या प्रक्रियेमुळे, तुमच्या वैयक्तिक आयुष्यात जी प्रगती होईल, तिचे परीक्षण करा. तुमच्या विचारांत होणारी सुधारणा, तुमच्या मनाचा कल आणि आयुष्यातील सर्वसाधारण प्रगती, याचा आढावा घ्या. त्यानंतर तुम्हाला मिळालेली प्रेरणा आणि परमानंद यांचा अनुभव घ्या. भगवान बाबांमुळे मिळालेल्या सुरक्षेची प्रचिती घ्या. तद्नंतर आपल्याला सांभाळणारे आणि आश्रयस्थान असणारे भगवान बाबाच आहेत, या निर्णयाला तुम्ही याल.

तेव्हा, आत नुसता विचार करत न बसता, भगवान बाबांबद्दल, आपल्या मनोभावना काय आहेत, हे जाणून घ्यायला हवे. कारण दाट परिचय झाल्यानंतरच्या भावभावना या जिवलग मैत्रीसारख्याच असतात. यामध्ये परस्परांचा हृदयस्पर्श असतो. परस्परांवरच्या प्रेमाचा अनुबंध असतो. यासाठी, आपल्याला आपले उपजत ज्ञान, अंतर्ज्ञान जागृत करायला हवे. मग, आपल्याला त्या दैवी स्पर्शाची प्रत्येक क्षणी जाणीव होत राहील.

या सर्व गोष्टी आपण उत्तम प्रकारे समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे या भक्तीमार्गात आापण पुढे जाऊ शकू. त्यानंतर साधनेमध्ये पुढची प्रगती करणे शक्य होईल.

भगवान बाबांचा तुम्हाला शुभाशीर्वाद मिळो.

तुमचा खूप आभारी आहे.

पुढील सत्रांत आपण भेटूच.